निवडक ठाणे

मुरूडमध्ये उद्या लोडशेडिंग

मुरूड-जंजिरा : मागील मंगळवारी लोडशेडिंग घेतल्यानंतर पुन्हा एकदा मुरूड महावितरणने येणाऱ्या मंगळवारी लोडशेडिंग करण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणा केली आहे. मंगळवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भारनियमन करण्यात येणार आहे. याबाबत मुरूड महावितरणचे उप कार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी सांगितले की,पावसाळ्यापूर्वी मेंटन्सची सर्व कामे, त्याचप्रमाणे मुख्य वाहिनीवर येणाऱ्या वृक्षाची तोड करणे, झंपरची कामे पूर्ण करण्यासाठी सदरचे भारनियमन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. दोन आठवड्यात सलग भारनियन होत आहे. पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करण्यासाठी मुरूड महावितरणने पुन्हा एकदा भार नियमन करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सध्याचे तापमान ३८ डिग्री सेल्सियस पेक्षा जास्त असल्याने वीज १० ते ५ या मोठ्या अवधीत घालवणे योग्य नाही. परंतु मोठ्या अवधीकरिता वीज गायब ठेवल्याने लोकांची कामे खोळंबून खूप मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.

११ पोलीस अधिकारी, अंमलदारांना 'महासंचालक पदक' जाहीर

भाईंदर : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ११ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना महासंचालक पदक जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्र पोलीस विभागात विविध प्रकारच्या कर्तव्यामध्ये केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल राज्यातील पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांचे बोधचिन्ह, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्राने सन्मानित करण्यात येते. त्याअनुषंगाने २०२४ या वर्षातील उल्लेखनीय सेवेबद्दल आयुक्तालयातील ११ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांचे पदक (सन्मानचिन्ह) जाहीर झाले आहे. सदरील पदक जाहीर झालेल्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी १०-१५ वर्षाच्या सेवाकालावधीमध्ये केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीबाबत त्यांना पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी पोलीस महासंचालक पदक जाहीर केले आहे. यामध्ये मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ११ पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पोलीस महासंचालकांचे पदक जाहीर झालेल्यांमध्ये मीरा-भाईंदर गुन्हे शाखा युनिट -१ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे, सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजित गुंजकर, भरोसा सेलच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव, सहायक पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र पाटील व अशोक ईशी, अजय मांडोळे, पोलीस हवालदार जयप्रकाश जाधव व आनंद मोरे आणि मुकेश पोरे, पोलीस शिपाई नामदेव ईश्वलकर यांचा समावेश आहे. १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त मीरा-भाईंदर येथे पोलीस मुख्यालय येथे होणाऱ्या पथसंचालनावेळी या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अप्पर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक यांच्या हस्ते १ मे महाराष्ट्र दिनाच्या रोजी पोलीस महासंचालक पदक देऊन गौरविण्यात येणार आहे.

आ. प्रवीण दरेकर आज रायगड दौऱ्यावर

पोलादपूर: लोकसभा निवडणुकीतील दोन टप्प्यातील मतदान पार पडले असून उर्वरित तीन टप्प्यातील मतदान बाकी आहे. या पार्श्वभूमीवर भाजप विधानपरिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर हे निरीक्षक म्हणून सोमवारी २९ एप्रिल रोजी रायगड लोकसभेचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यात आ. दरेकर यांची सकाळी ११ वाजता अलिबाग विधानसभा कोअर कमिटी, निवडणूक संचलन आणि आघाडी मोर्चा प्रकोष्ठसह सेल यांचे विधानसभा अध्यक्ष यांच्यासोबत बैठक होणार आहे. तर दुपारी १२ वाजता महायुती समन्वयक बैठक, दुपारी ३ वाजता माणगाव विधानसभा कोअर कमिटी, निवडणूक संचलन आणि आघाडी मोर्चा प्रकोष्ठ व सेल यांचे विधानसभा अध्यक्ष यांच्यासोबत बैठक, दुपारी ४ वाजता महायुती समन्वयक बैठक, सायं. ७ वाजता पेण विधानसभा येथील कामत हॉटेल येथे कोअर कमिटी, निवडणूक निरीक्षक, आघाडी मोर्चा प्रकोष्ठ व सेल यांचे विधानसभा अध्यक्ष यांच्यासोबत रायगड जिल्हा व पेण विधानसभेतील महायुतीच्या समन्वयकांची बैठक होणार आहे

कर्जतमध्ये गाव-वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा

२५ गावे आणि २८ वाड्यांसाठी संस्था, संघटना, फाऊंडेशनही सरसावले

विजय मांडे/ कर्जत

सध्या कडक उन्हाळ्याच्या झळा कर्जतकरांसाठी त्रासदायक ठरत आहे. यापूर्वी कर्जतमध्ये ३५, ३८ अंशाच्यावर तापमान कधी वाढले नव्हते. मात्र यावेळेस ४० ते ४२ अंशाच्यावर तापमान वाढल्याने मराठवाडा अथवा विदर्भप्रमाणे उन्हाची झळ कर्जतमध्ये जाणवत आहे. अंगाची लाहीलाही होत असून त्यात अनेक गावात विहिरी, बोअरवेल, नद्या, नाले सगळेच कोरडे पडल्याचे भयानक चित्र पहावयास मिळत आहे. वाड्यापाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा आराखडा करण्यात आला आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या भेडसावत आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून पाणीटंचाई निवारणासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. पाण्याची समस्या गंभीर असलेल्या २५ गावे आणि २८ वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

दरवर्षी पंचायत समिती उन्हाळ्यात टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी अराखडा तयार करत असते.

गावे	लोकसंख्या
आषाणे	७२२
पिंगळस	४२७
मोग्रज	४५०
किरवली	६००
जांभुळवाडी	२७९
मेचकर वाडी	४५०
फणसवाडी	३००
भक्तीची वाडी	३५०
खांनन	४२५
वर्णे	३००
मोहपाडा	२५०

उपाययोजनांचा कृती आराखडा तक्ता

ऑक्टोबर २०२३ ते जून २०२४ पाणीटंचाई भासणाऱ्या गाव व वाड्यांची यादी व त्यासाठी पाणीपुरवठा उपाययोजनांचा कृती आराखडा तक्ता विहीर खोल करणे, गाळ काढणे ७५ लाख रुपये, विंधण विहीर अधिग्रहण निरंक, टँकर बैलगाडीव्दारे पाणीपुरवठा ३९.७ लाख रुपये, प्रगती पथावरील नळ पाणीपुरवठा योजना-निरंक, नळ पाणीपुरवठा योजना विशेष दुरुस्ती करणे-निरंक, विंधण विहीर विशेष दुरुस्ती करणे - २४ लाख रुपये, नवीन विंधण विहीर घेणे- १४.४ लाख रुपये, तात्पुरती पुरक नळ पाणीपुरवठा योजना- निरंक, विंधण विहीर जलभंजण करणे - निरंक एकूण एक कोटी ५३ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आला आहे. तर २५ गावे आणि २८ वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

एवढ्या वर्षात उन्हाळा कधी जाणवला नव्हता. मात्र यावेळेस उन्हाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यात पाण्याची पातळी खाली गेल्याने रणरणत्या उन्हात महिलांना पाण्याचा हंडा घेऊन कुटुंबाची तहान भागवावी लागत आहे. त्यामुळे महिला मोठ्या प्रमाणात आजारी पडत आहेत.
- आशा पालकर, ग्रामस्थ.

ठराविक गावे, वाड्यापाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. मात्र यावेळेस गावांचा आकडा वाढला आहे. शासन दरवर्षी आपली जबाबदारी पार पाडत असते. काही संस्था, संघटना, फाऊंडेशनच्या माध्यमातून देखील पाण्याचे टँकर पुरविले जात आहेत.

निम्मा एप्रिल महिना संपत आला तरी पावसाची चिन्हे दिसत नसल्याने प्रशासनाच्या तोंडचे पाणी पळाले आहे. अशातच कडक उन्हामुळे धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून टंचाईग्रस्त भागातील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवण्यासाठी टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. महिलांना या वर्षी जास्तच कसरत करावी लागत आहे. त्यात पाण्याने तहान भागविण्यासाठी हॉस्पिटलचीही भरती करावी लागते. 'असा उन्हाळा नको ग बाई' अशी बोलण्याची वेळ महिलांवर येऊन ठेपली आहे. गावांमध्ये महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. त्यामुळे प्रशासनाकडून टँकरचे प्रस्ताव वाढू लागले आहेत, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे.

ठाणे लोकसभेसाठी नरेश म्हस्के यांचे नाव चर्चेत

ठाणे : नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही अद्याप ठाणे लोकसभेचा उमेदवार जाहीर होत नसल्याने या लोकसभा मतदारसंघावरून कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. ठाणे लोकसभेचा दावा भाजपने जवळपास सोडला असल्याने या ठिकाणी आता शिंदेच्या शिवसेनेचाच उमेदवार उभा राहणार असल्याचे निश्चित झाले असून यासाठी आता शिवसेनेचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. दुसरीकडे ठाणे लोकसभेचा उमेदवार जाहीर होण्याची दाट शक्यता असल्याने आजपासून ठाणे लोकसभेच्या जागेचा धुराळा आजपासून उडणार आहे.

ठाणे शिवसेनेचेच की भाजपचे गेल्या अनेक दिवसांपासून यासंदर्भातील दावे-प्रतिदावे सुरू होते. भाजपने या मतदारसंघावरती आपला दावा सांगितला होता. हा शिवसेनेचा पारंपरिक मतदारसंघ असल्याने शिवसेना हा मतदारसंघ सोडायला तयार नव्हता. अखेर हा मतदारसंघ शिवसेनेकडेच गेला असून या ठिकाणी आता शिवसेनेचाच उमेदवार उभा राहणार असल्याचे निश्चित झाले आहे. भाजपकडून माजी खासदार संजीव नाईक आणि आमदार संजय केळकर यांच्या नावांची चर्चा होती. मात्र हा मतदारसंघ शिवसेनेकडे गेला असल्याने या दोन्ही नावांना आता पूर्णविराम मिळाला असल्याचे बोलले जात आहे. तर शिवसेनेकडून सुरुवातीपासून रवींद्र फाटक आणि त्यानंतर प्रताप सरनाईक यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. शिवसेनेचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांचे नाव सुरुवातीला आघाडीवर नव्हते. मात्र शनिवार आणि रविवारी या दोन दिवसांत नरेश म्हस्के यांच्या नावाची चर्चा दिवसभर सुरू होती. वरिष्ठ पातळीवरही म्हस्के यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून केवळ औपचारिक घोषणा होणे शिल्लक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सध्या शिवसेनेच्या प्रवक्तेपदाची जबाबदारी त्यांच्यावर असून अनेक वेळा त्यांनी टीकेला प्रत्युत्तर देताना अनेक बड्या नेत्यांना अंगावर घेतले आहे. त्यामुळे नरेश म्हस्के यांचे नाव जाहीर झाल्यास ही निवडणूक अधिक रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. नरेश म्हस्के यांच्याशी यासंदर्भात संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

पालिकेत नेहमीच सक्रिय

नरेश म्हस्के हे ठाणे महापालिकेचे माजी महापौर असून त्यांनी ठाणे महापालिकेत अनेक महत्वाची पदे भूषवली आहेत. ठाणे महापालिकेत शिवसेनेची सत्ता आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा असून महापालिकेच्या कारभारात ते नेहमीच सक्रिय राहिले आहेत. ठाणे महापालिकेतील शिवसेनेच्या सगळ्याच माजी नगरसेवकांचे त्यांना समर्थन असल्याचा दावा त्यांचे निकटवर्तीय करत असून ठाण्यातील भाजपच्या नेत्यांशीही त्यांचे संबंध चांगले असल्याने याचा फायदा त्यांना निवडणुकीमध्ये होण्याची चिन्हे आहेत.

सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची दोन मुलांसह आत्महत्या

दिंडोरी : सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेने आपल्या दोन मुलांसह शेततळ्यात उडी मारून आत्महत्या केल्याची घटना दिंडोरी तालुक्यातील खतवड येथे घडली. या प्रकरणी पती, सासू, दीर यांच्याविरुद्ध दिंडोरी पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून तिघांना अटक करण्यात आली आहे.

चांदवड तालुक्यातील धोंडगव्हाणवाडी येथील चंद्रकांत नारायण पुरकर यांची मुलगी अश्विनी (३१) हिचा विवाह १६ मे २०१२ रोजी खतवड ता दिंडोरी येथील अर्जुन सुदाम मुळाणे यांच्यासोबत झाला होता. लग्नानंतर काही दिवसापासूनच मयत अश्विनीचा माहेरून पैसे आणण्यासाठी शारीरिक, मानसिक छळ सुरू झाला. पुरकर कुटुंबीयांनी वेळोवेळी रक्कम देत भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला परंतु नवरा अर्जुन सुदाम मळाणे, सासू हिराबाई, दीर प्रमोद वेळोवेळी विविध कारणांनी अश्विनीला शारीरिक व मानसिक छळासोबत मारहाण देखील करत होते. त्यांच्या जाचास कंटाळून २६ एप्रिल रोजी शेततळ्यात मोठा मुलगा सिद्धेश (९) लहान मुलगा विराज (६) यांच्यासह उडी मारत आत्महत्या केली. याप्रकरणी दिंडोरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करत अटक केली.

गौण-खनिजाची वाहतूक करणाऱ्या डंपरचालकाविरोधात गुन्हा

नवी मुंबई : शासनाचा महसूल बुडवून अवैध मार्गाने खडीची वाहतूक करणारा डंपर महसूल विभागाच्या पथकाने कारवाईसाठी ताब्यात घेतला. मात्र डंपरचालकाने महसूल विभागाच्या पथकाची नजर चुकवून सदर डंपर घेऊन पलायन केल्याचा प्रकार खारघर येथे घडला आहे. खारघर पोलिसांनी पळून गेलेल्या डंपर चालकांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

काही टोळ्या गौण-खनिजाचे अनधिकृतरित्या उत्खनन करून त्याची बेकायदेशीररीत्या वाहतूक करून नेत असल्याची माहिती मिळाल्याने पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी अनधिकृत गौण खनिज वाहतुकीवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मंडळ अधिकारी व तलाठी आदींच्या पथकाने २४ एप्रिल रोजी खारघर येथील ओवेगाव ते पापडीचा पाडा या रोडवरील खुटुकबंधन गावाजवळ एक डंपर ६ ब्रास गौण-खनिज खडी घेऊन जात असल्याचे या पथकाला निर्दशानास आले. त्यामुळे महसूल विभागाच्या पथकाने सदर डंपर अडवून त्याच्याकडे गौण-खनिजाच्या रॉयल्टी पावतीबाबत विचारणा केली.

मात्र सदर चालकाने खडीची रॉयल्टी शासनास भरली नसल्याचे सांगितले. त्यामुळे महसूल विभागाच्या पथकाने डंपरचालकाला डंपर घेऊन पुढील कार्यवाहीकरीता पनवेल येथील तहसीलदार कार्यालयात येण्याचे आदेश दिले. मात्र डंपरचालकाने महसूल विभागाच्या पथकासमोर खडीने भरलेला डंपर घेऊन त्याठिकाणावरून पलायन केले. त्यामुळे महसूल विभागाने पळून गेलेल्या डंपरचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

प्रेयसीचा खून केल्याप्रकरणी टॅक्सीचालकाला अटक

उरण: चिरनेर येथे दि. २५ एप्रिल रोजी सापडलेल्या अनोळखी महिलेच्या मृतदेहाची ओळख पटली असून तो मृतदेह मानखूर्द, मुंबई येथील महिलेचा असल्याचे स्पष्ट झाले आहे. रिक्षाचालक प्रियकराने या महिलेचा खून करून तिचा मृतदेह येथे फेकून दिला होता. मृत महिलेचे नाव पुनम चंद्रकांत क्षिरसागर (२७) असे असून खून करणाऱ्या टॅक्सीचालकाचे नाव निजामुद्दीन अली, रा. नागपाडा असे आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पुनमचे टॅक्सीचालक निजामुद्दीन याच्यासोबत प्रेमसंबध होते. ती जे. जे. हॉस्पिटल येथे कामावर गेली असताना निजामुद्दीनने टॅक्सीतून खडवली, कल्याण येथे घेऊन गेला.

तेथे गेल्यानंतर निजामुद्दीनने तिला ठार करून तिचा मृतदेह चिरनेर येथील नाल्यात फेकून दिल्याचे निदर्शनास आले. उरण पोलिसांनी तातडीने याबाबत तपास करून मृतदेहाची ओळख पटवून याप्रकरणी निजामुद्दीन यास अटक केली. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुर्यकांत कांबळ, सहा. पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे, संजय राठोड, पोलीस कर्मचारी रूपेश पाटील, प्रमोद कोकाटे आणि रियाज शेख यांनी तपास करून हा गुन्हा उघडकीस आणला.

वैशाली दरेकर ३० एप्रिलला उमेदवारी अर्ज भरणार

डोंबिवली : कल्याण लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर या ३० तारखेला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. दरेकर यांचा उमेदवारी अर्ज भरताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यासह संजय राऊत, जितेंद्र आव्हाड उपस्थित राहणार आहेत.

या दिवशी आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडी निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. दरेकर यांचा उमेदवारी अर्ज भरताना महाविकास आघाडीकडून शिवाजी महाराज पुतळा - मानपाडा चौक -टिळक चौक - शेलार नाका - घरडा सर्कल आणि क्रीडा संकुलापर्यंत रॅली काढण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण जिल्हाप्रमुख सदानंद थरवळ यांनी बैठकीनंतर दिली.

तरुणीवर बलात्कार करून धर्मांतराची सक्ती केल्याप्रकरणी गुन्हा

भाईंदर : मीरारोड येथे राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणीबरोबर मैत्री करून तिच्यावर बलात्कार केला. तिचे अश्लील छायाचित्रे काढून तिला ब्लॅकमेल करत पैसे उकळले तसेच तिला मारहाण करत मुस्लिम धर्म स्वीकारण्याची सक्ती केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तसेच तिच्यावर वारंवार अत्याचार करून तिचे केस कापून तिला विद्रुप करण्यात आले. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात ६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरारोड येथे राहणारी पीडित तरुणी २६ वर्षांची आहे. तरुणी मीरारोड येथे कुटुंबासह राहत असून ती महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. तरुणीने नयानगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार सप्टेंबर २०२३ मध्ये गणपती आगमनाच्या वेळी मोहसीन शेख याच्याशी त्या तरुणीची ओळख झाली होती. या ओळखीतून त्यांची मैत्री झाली. ऑक्टोबर महिन्यात त्या तरुणीचे आई व भाऊ हे काही दिवसासाठी बाहेर गेले असता त्याचा फायदा घेत मोहसीन तरुणीच्या घरी बिर्याणी घेऊन आला. त्याने बिर्याणी खायला दिली त्यामध्ये गुंगीकारक पदार्थ मिसळले होते.

यानंतर पीडित तरुणी बेशुद्ध झाल्यानंतर मोहसीनने तिच्यावर बलात्कार केला आणि तिची अश्लील छायाचित्रे काढली. यानंतर तिला मुस्लिम धर्म स्वीकारण्याची सक्ती करू लागला. तिने नकार दिल्यावर सतत तिला मारहाण करू लागला.

उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर प्रचाराला वेग

कुरुक्षेत्रातील अर्जुनासारखी कार्यकर्त्यांची अवस्था

राजकीय पक्षाचे उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करताना मोठा फौजफाटा आपल्यासोबत नेत असतात. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी जोरदार शक्तिप्रदर्शन आवश्यक असले तरी सगळ्याच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मनात अस्वस्थता आहे. कुरुक्षेत्रात लढणाऱ्या अर्जुनासारखी आमची अवस्था झाली असल्याची त्यांची भावना आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघात अद्याप महायुतीचा उमेदवार निश्चित झाला नसल्याने मतदारसंघात राजकीय धुरळा उडालेला नाही मात्र उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर प्रचाराला वेग येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी, महायुतीची अद्याप एकही मोठी सभा झाली नसली तरी विभागीय मेळावे घेण्याचा सिलसिला सुरू झाला आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघात महायुतीचा उमेदवार कोण असणार हे सस्पेन्स असले तरी महायुतीतील घटक पक्षांचे स्थानिक पातळीवरचे नेते एकमेकांना भेटून चर्चा करत असल्याचे चित्र दिसत आहे. असे असले तरी कार्यकर्त्यांमध्ये मात्र मोठ्या प्रमाणात चलबिचल आहे. आपल्या नेत्याने बदललेल्या राजकीय निष्ठेमुळे समर्थन कशाचे करायचे हा गहन प्रश्न कार्यकर्त्यांसमोर उभा राहिला आहे. वर्षानुवर्ष आपल्या लाडक्या नेत्यासाठी मेहनत घेणाऱ्या शिवसैनिकांसमोर शिवसेना पक्षाचे दोन गट झाल्यामुळे यंदाच्या निवडणुकीत प्रचार करताना त्यांची द्विधा मनस्थिती अधिकच बिकट झाली आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी पक्षाच्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांची देखील अवस्था वेगळी नाही. मूळ आणि बाहेरून आलेला हा संघर्ष दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना अडचणींचा ठरत आहे. समाज माध्यमांवर दोन्ही गटांचे कार्यकर्ते वेगवेगळ्या पोस्ट आणि व्हिडीओ अपडेट करून आपल्या मनातील भावना व्यक्त करत असले तरी त्यामुळे कार्यकर्त्यांच्या मनातील नेमकी खदखद बाहेर येत आहे.

शिवसेनेचे ठाणे ओळख असलेल्या ठाणे शहरात शिवसेना दोन गटात विभागली गेली. ठाण्यात शिंदेसेना आणि उद्धवसेना अशा दोन गटात शिवसेना विभागली गेली. दोन्ही गट ठाण्यात आपले अस्तित्व दाखवण्याची एक ही संधी सोडत नाही. लोकसभा निवडणुकीत दोन्ही गट एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. निवडणुकीत या दोन गटातच लढत होणार हे निश्चित आहे.

कार्यकर्त्यांमध्ये सुप्त संघर्ष

ठाणे लोकसभेसाठी भाजप आणि शिंदे गट शिवसेनेत जोरदार रस्सीखेच आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघ भाजपला परत मिळावा यासाठी भाजप कार्यकर्त्यांची आग्रही भूमिका वेळोवेळी लपून राहिलेली नाही. ठाणे शहरात महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजप आणि शिंदसेना यांच्यात सर्व अलबेल आहे असे दाखवण्यात येत असले तरी कार्यकर्त्यांमध्ये असलेला सुप्त संघर्ष लपून राहिलेला नाही. भाजप अथवा शिंदे गट यापैकी कोणा एकाला जरी लोकसभेची उमेदवारी मिळाली तरी दोन्ही कार्यकर्त्यांचे मनोमिलन घडवून आणण्याची जवाबदारी दोन्ही पक्षातील प्रमुख नेत्यांवर असणार आहे. त्यावरच निवडणुकीत विजयाचे गणित अवलंबून असणार आहे. अबकी बार.. राहू दे नंतर वचपा काढू अशी स्थिती आहे.

मोठ्या नेत्यांच्या विधानांमुळे वातावरण गढूळ

देशात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा ज्वर चढत चालला आहे. सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांची राजकीय विधाने एका नवीन वादाला आमंत्रण देत आहेत. याचा थेट परिणाम पक्षाच्या कार्यकर्त्यांवर होत असून एकमेकांना पाहून घेऊ.. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये दरी वाढत चालली आहे.

ठाणे शहरात सोमवारपासून सर्वच पक्षाचे उमेदवार जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात करणार आहेत. त्यामुळे आधीच चाळीस डिग्री तापमान असलेल्या ठाणे शहराचे राजकीय तापमान मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचे चित्र पहावयास मिळणार आहे.